Page No. 46 | http://www.epitomejournals.com Vol. 7, Issue 12, Dec. 2021, ISSN: 2395-6968
The journal has been uploaded in UGC CARE PORTAL. (RTI)

Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# GRAMIN BHAGATIL SHALABHAHYA MULA-MULINCHYA AARTHIK STHITIVAR BHASHYA



**Author**
**Uday Gautam Athawale**
**Research Student**
**Dept. of Economics**
**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad MS**

**Co-author**
**Dr. Krutika V. Khandare**
**Assistant Professor**
**Dept. of Economics**
**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad MS**

# “ग्रामीण भागातील शाळाबाह्य मुला–मुलींच्या आर्थिक स्थितीवर भाष्य.”

उदय गौतम आठवले

संशोधक विद्यार्थी

एम. ए. , एम. फिल, (अर्थशास्त्र)

अर्थशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

डॉ. कृतिका वि. खंदारे

सहाय्यक प्राध्यापीका

अर्थशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**गोषवारा :–**

प्रस्तूत संशोधन निबंधामध्ये ग्रामीण भागातील शाळाबाह्य मुला–मुलींच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेण्यात आलेला आहे. वर्तमान स्थितीमध्ये ग्रामीण भागामध्ये जाणवणारी शिक्षणाविषयक शाळाबाह्य विद्यार्थ्याची वाढती संख्या ही शासणासमोरील मुख्य समस्या आहे. शाळाबाह्य विद्यार्थी म्हणजे असे मुले जी शाळामध्ये प्रवेशच घेत नाहीत अथवा आपला अभ्यासक्रम पुर्ण न करता मध्येच शाळा सोडून जातात. त्यांना मुलभूत साक्षरता प्राप्त होत नाही, याला प्रामुख्याने ह्या मुलांच्या पालकांची आर्थिक परिस्थिती कमकूवत असणे अधिक जवाबदार असल्याचे दिसून येते.

प्रस्तुत शोध निबंध हा मुर्तीजापूर तालुक्यातील ग्रामीण भागापूरता मर्यादित आहे. यामध्ये १४८ गावापैकी १५ गावे सहेतूक नमूना पध्दतीद्वारे निवडून त्यातून लोकसंख्येच्या आधारे ७४ कुटूंबाची नमुना म्हणून निवड करण्यात आली. प्रश्नावली, अनुसुची तसेच निरिक्षण यासारख्या साधनांचा माहीती एकत्रीत करण्याकरीता उपयोग करण्यात आला. शिवाय महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल, भारताची जनगणना २०११, प्राथमिक शिक्षणविषयक शासणाचे अहवाल, शोधप्रबंध, शोध-निबंध तसेच संबधीत विविध पुस्तके यांचा आधार घेण्यात आलेला आहे.

ह्या शोध–निबंधामध्ये शाळाबाह्य मुलां–मुलींच्या आर्थिक समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याकरीता शाळाबाह्य मुलांच्या कुटूंबाचा आर्थिक आढावा घेण्यात आला. त्यांचा आर्थिक पैलूने अभ्यास केला असता असे दिसून आले की, ग्रामीण भागातील शाळाबाह्य मुलां मुलींच्या

कुटूंबाची आर्थिक परिस्थिती ही खालावलेली आहे. आणि त्याचा विपरीत परिणाम ह्या मुलांच्या शिक्षणावर होतांना दिसून येतो.

**प्रस्तावना :–**

महाराष्ट्र शासनाच्या (प्राथमिक शिक्षणासंदर्भातील) शिक्षणाचे सार्वत्रीकरण करण्याच्या शैक्षणीक धोरणामध्ये सध्या स्थितीत जाणवणारी सर्वात महत्त्वाची समस्या म्हणजे “शाळाबाह्य मुले आणि मुली” ही होय. जिल्ह्या परिषद च्या प्राथमिक शाळामध्ये ही समस्या प्रामुख्याने आढळून येते. यात विद्यार्थी शाळेतून अभ्यासक्रम पुर्ण न करता निघून जाणे; तसेच सतत शाळेमध्ये गैरहजर असणे ही आजही खुप मोठी समस्या आहे.

‘शाळाबाह्य विद्यार्थी’ म्हणजेच, एखादा विद्यार्थी प्राथमिक शाळेमध्ये दाखल झाल्यानंतर तो कायमस्वरुपी साक्षरता प्राप्त करण्यापुर्वीच शाळा सोडून जातो; त्यावेळी त्याला शाळाबाह्य म्हणून संबोधल्या जाते. प्राथमिक शाळेमध्ये नोंदणी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी शिक्षणक्रम पुर्ण करणे आवश्यक असते. त्यांनी जर मध्येच शाळा सोडली तर त्यांच्यावर खर्च करण्यात आलेला पैसा आणि मानवी प्रयत्न वाया गेलेत असे म्हणावे लागते. महाराष्ट्रामध्ये प्राथमिक शिक्षण हे सार्वत्रिक मोफत आणि सक्तीचे केलेले असल्यामूळे पालकांना आपल्या पाल्यांना शाळेमध्ये दाखल हे करावेच लागते; मात्र थोड्या अवधीत आपल्या अनेक अडचणीमुळे ही पाल्य शाळेपासुन दुरावली जातात. त्यात त्यांना प्रामुख्याने आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते. ही शाळाबाह्य मुलां–मुलीचे प्रमाण आर्थिकदृष्ट्या मागास तसेच अ. जा. आणि जमाती मधील कुटुंबात अधिक पाहावयास मीळते. त्यामुळे त्यांच्या आर्थिक समस्या जाणून घेणे हे महत्त्वाचे ठरते. जेणेकरुन समस्या माहीती असल्यास उपाययोजना करण्याच्यादृष्टीने वाटचाल करता येते.

**संशोधन साहीत्याचा आढावा :–**

ग्रामीण भागातील शाळाबाह्य मुलांच्या आर्थिक स्थितीवर भाष्य करीत असतांना प्रामूख्याने त्यांच्या कुटूंबाचा आर्थिक बाजूने परिस्थितीचा विचार महत्त्वाचा ठरतो. **महाराष्ट्राची आर्थिक पाहणी**

(२०१८– १९)[१], मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या माहीतीमध्ये महाराष्ट्रातील शाळाबाह्य मुला–मुलींची संख्या ही वाढत असल्याची चिंताजनक बाब समोर येत आहे. सर्वेक्षणाच्या आकडेवारीनूसार २०१६–१७ ह्या आर्थिक वर्षामध्ये शाळाबाह्यतेचा दर हा १.०६ असा होता तो २०१७–१७ मध्ये १.५६ ऐवढा वाढल्याचे दिसून येते. ***मुकूल अ. (२००९)*** [२] यांनी "ऑऊट ऑफ स्कुल चिल्ड्रेन इन इंडिया" या शिर्षकाखाली भारताच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाकरीता केलेल्या संशोधनात ६ ते १४ वर्ष वयोगटातील शाळाबाह्य मुलांची संख्या ८०.४ लाख असल्याचा निष्कर्ष काढला. त्यांच्या मते, भारतातील ग्रामीण कुटूबांचा आकार मोठा असल्या कारणाने त्यांची आर्थिक शक्ती ही कुटूंबाच्या दैनदिन पालन पोषणावर खर्च केल्या जाते; त्यातून मुलांच्या शिक्षणाकडे नकळत दुर्लक्ष होते.

*अन्सारी आर.(२००९)* [३] **"सोसीओ– इकोनॉमीक फॅक्टर ऑफ ड्रॉपआऊट सिचव्हेशन इन रूरल प्रायमरी एज्युकेशनः ए स्टडी ऑफ टु व्हिलेज इन राजशाही डिस्ट्रीक्ट. सोशल क्रीमीनल"** यामध्ये संशोधकांनी बांग्लादेशातील ग्रामीण भागात होत असलेल्या प्राथमीक शिक्षणातील गळतीला जवाबदार आर्थिक कारणाचा आढावा घेतला. त्यांनी असे निष्कर्ष काढलेत की, ग्रामीण भागातील खुप मोठी लोकसंख्या ही शेती क्षेत्रावर अवलंबून आहे. पारंपारिक शेती मार्फत अधिकचे उत्त्पन्न प्राप्त करणे शक्य नाही त्यामूळे तेथील ग्रामीण नागरीक हे आर्थिकदृष्ट्या गरीब आहेत. त्यामूळे कुटूंबातील सर्व सदस्यांना काम करावे लागते. त्यात बालमजुरांचा देखील वापर होतो. यातून त्यांना शाळांमध्ये जाण्यापासून थोपविल्या जाते. या कारणामूळे १४.२९ % विद्यार्थ्यानां आपली शाळा सोडावी लागली.

*बिहारी आर. (१९७१)* [४] **"वेस्टेज अॅन्ड स्टेग्नेकेशन अमंग द ट्रायबल्स", गुजरात विद्यापीठ.** यांनी आपल्या शोध प्रबंधामध्ये आर्थिक मागासलेपण हे शैक्षणिक गळतीकरीता प्राथमिक कारण असल्याचे नमूद केले. *दासी आणि खान एम. झेड. (२०००)* [५] **" ए स्टडी ऑफ द वेस्टेज अॅन्ड स्टेग्नेकेशन अॅट द इलेमिंटरी लेव्हल ऑफ एज्युकेशन इन द स्टेट ऑफ आसाम विथ स्पेशल रेफरन्स टू द प्रायमरी स्टेज"** यांनी शाळाबाह्य मुलांच्या मार्फत सामाजिक मुल्यांची कश्याप्रकारे हेंडसांड केल्या जाते या संदर्भात सर्वेक्षण केले. यात त्यांना असे दिसून आले की, विद्यार्थी शाळामध्ये न जाण्यास प्रामुख्याने

कुटूंबाची बिकट आर्थिक स्थिती जवाबदार आहे. मर्यादित उत्पन्न, राहण्यास घर नसणे त्यांची पालक व स्वतः ही मुले मजुरी करतांना दिसून येतात. त्यामूळे ते शाळांमध्ये जाऊ शकत नाहीत.

**संशोधनाचा उद्‌देश :–**

- शाळाबाह्य मुला–मुलींच्या आर्थिक समस्या जाणून घेणे.
- समस्यावर उपाय–योजना सुचविणे.

**संशोधनाची गृहीतकृत्य :–**

- शाळाबाह्य मुला–मुलींच्या कूटुंबाची आर्थिक स्थिती खालावलेली आहे.

**संशोधन पध्दती :–**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम आणि प्राथमिक साधन सामग्रीचा वापर हा करण्यात आलेला आहे. त्यात प्राथमिक साधनामध्ये उत्तरदात्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन त्यांच्या मार्फत 'अनुसूची' ही भरुन घेतली आहे. तसेच संशोधन उदिष्टाच्या पुर्तीकरीता दुय्यम साधनात विविध संदर्भग्रंथे,जिल्हा परिषदचे शिक्षणविषयक अहवाल, भारतीय जनगणना अहवाल, शासनाच्या शिक्षण विषयक योजनाचा आढावा, तसेच शाळाबाह्य मुलाविषयी माहीती प्रसिध्द करणाऱ्या विविध गैरशासकीय संस्थाचे अहवाल यांचे अध्ययन करण्यात आले.

**शाळाबाह्य मुला–मुलींची आर्थिक स्थिती :–**

कोणत्याही समाज घटकाची वा व्यक्तीची आर्थिक स्थिती ही त्याच्याकडे उपलब्ध असणारी स्थावर मालमत्ता, व्यवसाय, रोजगाराची उपलब्धता, रोजगारातून प्राप्त होणारे वेतन, रोजगाराची साधने, पशुधन यासारख्या बाबीवर अवलंबून असते. प्रस्तूत शोध–निबंधामध्ये या निकषाचा अभ्यास केला असता ह्या शाळाबाह्य मुला–मुलींच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती अतिशय कमकुवत असल्याचे निर्देशनास येते. याला कारण त्यांच्यामध्ये असलेला कमालीचा अज्ञानीपणा तसेच पुर्वापार पासून चालु असलेल्या कामामध्ये बदल न करणे; यामुळे यांच्या दारिद्र्यात फारसा बदल होत नाही.

ज्या निकषाच्या आधारे प्रस्तूत अभ्यास घटकांची आर्थिक स्थिती वर्णवीण्यात आली त्या निकषांची स्थिती पुढील प्रमाणे दिसून येते.

**तक्ता क्र. १. स्थावर मालमत्ता**

| अ. क्र. | शेतीची स्थिती | | | | | घराची स्थिती | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शेतीची उपलब्धता | शेतजमीनीचे स्वरुप | | वारंवारीता | टक्केवारी | तपशिल | वारंवारीता | टक्केवारी |
| | | बागायती | कोरडवाहू | | | | | |
| १. | नाही | -- | -- | ४५ | ६०.८ % | झोपडी, छप्पर, कुड | ०८ | १०.८ |
| २. | २ एक्करपेक्षा कमी | -- | १६ (१०० %) | १६ | २१.६ % | दगळ मातीच्या भिंती व पत्रे | ३२ | ४३.२ |
| ३. | २ ते ३ एक्कर | -- | ०७ (१०० %) | ०७ | ०९.५ % | पक्या विटा व पत्रे | १८ | २४.२ |
| ४. | ३ ते ४ एक्कर | -- | ०५ (१०० %) | ०५ | ०६.८ % | सिमेंट कॅांक्रिट | ०७ | ०९.४ |
| ५. | ५ एक्कर पेक्षा अधिक | -- | ०१ (१०० %) | ०१ | ०१.४ % | दगळ मातीच्या भिंती वर छप्पर | ०९ | १२.२ |
| | **एकुण** | -- | २९ (३९.२ %) | ७४ | १०० % | **एकुण** | ७४ | १००.०० |

*स्त्रोत : प्रत्यक्ष नमूना पाहणी.*

*टिपः – नमुना म्हणुन मुर्तीजापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील ७४ कुटूंब निवडण्यात आली.*

*– तक्त्यातील आकडेवारी नमन्यावर आधारीत आहे.*

तक्ता क्र . १ मध्ये मुर्तीजापूर तालुक्यातील ग्रामीण शाळाबाह्य मुलांच्या कुटूंबाच्या स्थावर मालमत्तेचे वर्णन करण्यात आलेले आहे. त्यामध्ये त्यांच्या कुटूंबाची शेतीविषयक स्थिती तसेच राहत्या घराच्या स्थितीची माहीती प्रदर्शित करण्यात आलेली आहे. तक्त्यामध्ये दााखविल्या प्रमाणे ७४ कुटूंबापैकी केवळ २९ कुटूंबाकडेच स्वतःची शेतजमीन आहे. यात कुटूंबातील कोणत्याही सदस्याच्या मालकीची बागायती शेती नाही. यात पुर्णतः कोरडवाहू शेतजमीनीचा समावेश होतो. त्यामूळे त्यांना अल्प उत्पन्नावर समाधान मानावे लागते. तसेच सर्वाधिक ४५ (६०.८ %) कुटूंबे ही भुमीहीन आहेत, मात्र ते प्रामुख्याने शेती क्षेत्रावरच अवलंबून आहेत. यातील ४३.२ % कुटूंब तर शेतमजूर म्हणूनच काम करतात. यांच्या मालकीची जमीन नसल्याकारणाने त्यांना आपली उपजिविका भागविण्याकरीता इतर पारंपारीक व्यवसाय किंवा दुसऱ्यांच्या शेतामध्ये मजूरी करावी लागते. त्यांची आर्थिक परिस्थीती ही तीतकीशी चांगली नाही.

या मुलांच्या कुटूंबाच्या निवासाविषयी विचार जर केला असता त्यात फारसी सुधारणा झाल्याचे दिसून येत नाही. ७४ नमुन्यापैकी ०८ (१०.८%) कुटूंबे ही झोपडी, छप्पर, कुड असलेल्या घरामध्ये राहतात. तर सर्वाधिक कुटूंबे ही २३ (४३.२ % ) दगळ मातीची भिंतीवर पत्रे असलेल्या घरामध्ये वास्तव्यास आहेत. १८ (२४.२ % ) कुटूंब हे पक्या विटांच्या भिंतीवर पत्रे असलेल्या घरामध्ये राहतात. तर ७ (९.४ % ) घरांचीच व्यवस्था ही सुयोग्य मानता येते ते सिमेंट कॉक्रीट च्या घरामध्ये वास्तव्य करतात, मात्र हा आकडा इतरांच्या तुलनेत अत्यल्प आहे. याचाच अर्थ बुतांश शाळाबाह्य मुलांची राहण्याची सोय ही योग्य स्वरुपाची नाही. यातील १०.८ टक्के कुटूंबाकडे तर त्याला घर म्हणावे की नाही अशी स्थिती आहे. ते एखादया नाल्याच्या शेजारी गाव वस्तीच्या बाहेर हे लोक आपले कुडाचे, प्लास्टीक कागदाचा वापर करुन झोपड्यामध्ये राहतात. त्यातून त्यांच्या आरोग्याविषयक समस्यांना नेहमीच तोंड दयावे लागते.

तक्ता क्र. ३ रोजगाराची स्थिती

| अ. क्र. | कामाचे क्षेत्र | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | शेतकरी | २१ | २८.४ % |
| २. | शेतमजूरी | ३२ | ४३.२ % |
| ३. | पारंपारिक व्यवसाय करणारे | १२ | १६.२ % |
| ४. | इतर | ०९ | १२.२ % |
| | एकूण | ७४ | १०० % |

तक्ता क्र. ३ वार्षीक उत्पन्न

| अ.क्र | वार्षीक उत्पन्न | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | २०,००० रु. पेक्षा कमी | ३१ | ४१.८९ %÷ |
| २. | २५,००० रु. | १९ | २५.६८ % |
| ३. | ३०,००० रु. | ०७ | ०९.४६ % |
| ४. | ३५,००० रु. | १० | १३.५१ % |
| ५. | ३५,००० रु. पेक्षा जास्त | ०७ | ०९.४६ % |
| एकूण | | ७४ | १००.०० % |

*स्त्रोत : प्रत्यक्ष नमूना पाहणी.*

*टिपः – नमुना म्हणुन मुर्तीजापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील ७४ कुटूंब निवडण्यात आली.*

*– तक्त्यातील आकडेवारी नमुन्यावर आधारीत आहे.*

वरील तक्ता क्र. २ आणि ३ मध्ये अनुक्रमे शाळाबाह्य मुला–मुलींच्या कुटूंबाची रोजगारविषयक स्थिती आणि वार्षीक उत्पन्नाविषयक माहीती प्रदर्शित करण्यात आलेली आहे. यात आपल्याला २१ (२८.४ % ) शाळाबाह्य मुलांच्या कुटूंबातील शेतकरी आहेत तर ३२ (४३.२ % ) पालक हे शेतमजूरी करून आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह करतांना दिसून येतात. तसेच १२ (१६.२ % ) पालक हे आपला पारंपारिक व्यवसाय करतांना दिसून येतात. त्यात शिंपीकाम, वाद्य वाजविणे, मातीची मडकी बनविणे,

पादत्राणे शिवणे तसेच लोहकाम इ. यासारख्या पारंपारीक व्यवसायाचा समावेश होतो. या कुटूंबाचे व्यवसाय हे जरी आपला उदरनिर्वाह करण्यास काही अंशी सक्षम असले तरी त्यातून फारसे जास्त उत्पन्न प्राप्त होण्याची शक्यता कमी आहे.

तक्ता क्र. ३ मध्ये ह्या कुटूंबाच्या वार्षीक उत्पन्नाचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. २०,००० रुपयापेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या कुटूंबाची संख्या ही ३१ (४१.८९ % ) सर्वात जास्त तर २५,००० रुपये उत्पन्न असणाऱ्या कुटूंबाची संख्या ही १९ (२५.६८ % ) एवढी आहे. ३०,००० रु. आणि ३५,००० रु. वार्षीक उत्पन्न असणाऱ्या कुटूंबाची अनुक्रमे संख्या ही ०७ (०९.४६ % ) व १० (१३.५१ % ) एवढी असल्याचे निर्देशनास येते. आणि ३५ हजारापेक्षा जास्त वार्षीक उत्पन्न असणार ०७ (०९.४६ % ) एवढीच कुटूंब निर्देशनास आली. यावरून असे लक्षात येते की, ३०,००० रु. पर्यत वार्षीक उत्पन्न असणऱ्या कुटूंबाचे ७७.३ % एवढे अधिक प्रमाण असल्याचे दिसून येते. यावरून ह्या कुटूंबाच्या आर्थिक मागासलेपणाचा अंदाज लावता येतो.

## विचारविमर्ष :–

प्रस्तूत संशोधन–निबंध हा विदर्भासारख्या मागास भागामधील मुर्तीजापूर तालुक्यातील ग्रामीण भागापुरता मर्यादित आहे. यामध्ये लोकसंख्येच्या आधारावर १५ गावामधून ७४ कुटूंबाची नमूना म्हणून निवड करण्यात आलेली आहे. निबंधामध्ये मांडण्यात आलेले निष्कर्ष आणि काही आकडेवारी ही नमुन्याच्या अभ्यासातून प्राप्त करण्यात आलेली आहे.

एकंदरीत मुर्तीजापूर तालूक्यातील शाळाबाह्य मुलांच्या कुटूंबाची आर्थिक बाजू अभ्यासली असता असे दिसून येते की, यातील अधिक कुटूंबाकडे शेतजमीन उपलब्ध नाही. काही प्रमाणात अल्प – भुधारक आहेत मात्र ते देखील उदरनिर्वाहाकरीता अन्नधान्याची पीके घेतांना आढळून आलीत. आर्थिक स्थिती सुधारण्याकरीता पशूधन हे महत्त्वाचे साधन मानल्या जाते. मात्र तालुक्यातील बहुतांश शाळाबाह्य पाल्यांच्या पालकांकडे कोणत्याही स्वरुपाचे पशूधन वा उत्पन्न निर्मीतीच्या साधनांचा

अभाव दिसून येतो. यातील अधिक कुटूंब हे दारिद्र्यामध्ये असल्याचे दिसून आले. गावामध्ये रोजगार प्राप्त होत नसल्यामूळे वा ग्रामीण भागामध्ये रोजगारांच्या संधी कमी उपलब्ध असल्या मूळे ते आपले गाव सोडून रोजगार मीळेल अश्या ठिकाणी स्थलांतरीत होत आहेत. हे स्थलांतर अल्प कालावधी (रोजगार उपलब्ध असे पर्यत) करीता असते त्यातून लहान मुलांच्या शिक्षणाचे कधीही भरून न निघणारे नूकसान होते.

**निष्कर्ष :–**

एकंदरीत प्रस्तूत शोध–निबंधामध्ये केलेल्या अभ्यासामध्ये ग्रामीण भागातील शाळाबाह्य मुलांना ज्या काही आर्थिक अडचणी जाणवितात त्याचा ऊहापोह करण्यात आलेला आहे. त्यांच्या विविध आर्थिक पैलुवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. ह्या शाळाबाह्य मुला–मुलींच्या पालकांचे आर्थिक दारिद्र ही सर्वात मोठी अडचण आहे. त्याशिवाय रोजगाराचा अभाव, रोजगाराच्या साधनांचा अभाव तसेच कमी वेतन जास्त खर्च यासाखे अधिक महत्त्वपूर्ण कारणे देखील ह्या मुलांना शालेय शिक्षणापासून दुर ठेवण्यास तेवढेच अधिक जवाबदार आहेत.

शोध– निबंधामध्ये अभ्यासगटाच्या आर्थिक बाबींचा अभ्यास करण्यात आला, त्यात त्यांची आर्थिक बाजू ही कमकूवत असल्याचे निर्देशनास आले. त्यांचे वार्षीक उत्पन्न कसेतरी निर्वाहपातळी पर्यत पोहचतांना दिसते. निम्यापेक्षा असे कुटूंब आहेत ज्यांना राहण्यायोग्य घर नाही. हे ग्रामीण भागातील अधिकत्तर लोक हे हंगामाच्या काळामध्ये शेतमजूरी करतात आणि गावातील रोजगार संपल्यावर आपल्या कुटूंबासह रोजगार प्राप्ती करीता दुसरीकडे स्थलांतर करतात. उत्पन्न प्राप्ती करीता त्यांच्याकडे फारसे स्त्रोत नाहीत आणि अधिक पर्याय देखील नाहीत. यावरुन मांडण्यात आलेले गृहीतकृत्य “शाळाबाह्य मुलां–मुलींच्या कुटूंबाची आर्थिक स्थिती खालावलेली आहे.” हे खरे असल्याचे सिध्द होते.

**उपाययोजना :–**

विद्यार्थ्याचे शिक्षण हे त्यांच्या पालकांच्या आर्थिक कुवतीवर अवलंबुन असते. पालकांची आर्थिक परिस्थिती उत्तम असल्यास विद्यार्थ्याला जसे की, शिक्षणासाठी पोषक परीस्थीती, आवश्यक ते शैक्षणिक साहीत्य व शैक्षणिक सोयी - सुविधा प्राप्त करुन देऊ शकतात. सहाजिकच याचा विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर अनुकूल परिणाम होतो. मात्र अभ्यासाहेतु निवडण्यात आलेल्या कार्यश्रेत्रातील पालकांची आर्थिक स्थिती ही अत्यंत हालाखीची असल्याचे शोध–निबंधामध्ये दिसुन येते. आर्थिक पाठबळ नसल्या कारणाने ते आपल्या पाल्यांना वेळेवर शैक्षणिक साहीत्य तसेच इतर शालेय सोयी –सुविधा पुरविण्यास असमर्थ ठरतात. याउलट येथील पालक हे आपली आर्थिक स्थिती सुधारण्याकरीता विद्यार्थ्यांची घरकामात, शेतीकामात तसेच स्वतः करत असलेल्या कामामध्ये अर्थजनाहेतु कामात मदत घेतात. त्यामुळे ते अभ्यासात मागे राहतात. दारिद्रय आणि अज्ञानामुळे त्यांना शिक्षणापेक्षा इतर गरजा महत्त्वाच्या वाटतात. यातील बहुसंख्य पालक हे भुमिहीन शेतमजुर असल्याचे दिसुन येतात. त्यांना मजुरीचा मोबदला हा निर्वाह पातळीपेक्षा कमी दिल्या जातो. त्यामुळे घरखर्च भागविण्याकरीता ते विद्यार्थ्याकडुन वेगवेगळी कामे करुन घेतात.

अश्या प्रकारची आर्थिक परिस्थिती ही विद्यार्थ्याना शाळेत नियमित जाण्यास अवरोध निर्माण करते. त्यामुळेच पालकांची आर्थिक परिस्थिती ही त्यांच्या कुटूंबाच्या कीमान मुलभुत गरजा चांगल्या प्रकारे पुर्ण करु शकेल अशी असायला हवी. म्हणजे ते कमीत – कमी आपल्या पाल्यांना शाळेतून काढणार नाही. आणि पर्यायाने शाळाबाह्य मुला–मुलींची संख्या कमी होण्यास मदत मिळेल.

**संदर्भ सुचीः–**

१.) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल. (२०१८–१९).

२.) अक्षय मुकूल (२००९). “ऑऊट ऑफ स्कुल चिल्ड्रेन इन इंडिया.”

३.) अन्सारी आर. (२०१७). “सोसीओ– इकोनॉमीक फॅक्टर ऑफ ड्रॉपआऊट सिचव्हेशन इन रूरल प्रायमरी एज्युकेशनः ए स्टडी ऑफ टु व्हिलेज इन राजशाही डिस्ट्रीक्ट.” सोशल क्रीमीनल.

४.) बिहारी आर. (१९७१). "वेस्टेज अॅन्ड स्टेग्नेकेशन अमंग द ट्रायबल्स", गुजरात विद्यापीठ.

५.) दासी आणि खान एम. झेड. (२०००)."ए स्टडी ऑफ द वेस्टेज अॅन्ड स्टेग्नेकेशन अॅट द इलेमिंटरी लेव्हल ऑफ एज्युकेशन इन द स्टेट ऑफ आसाम विथ स्पेशल रेफरन्स टू द प्रायमरी स्टेज." फोर्थ सर्वे ऑफ रिसर्च इन एज्यूकेशन, व्हाल्युम सेकंड.

६.) नयनतारा, एस. (१९८५), "एज्यूकेशन इन रुरल इनव्हायर्मेन्ट." न्यू दिल्ली; आशिाष पब्लिशींग हाऊस.

७.) माळी, ए. एल. (१९९२), "महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळेतील गळती– स्थगीतीचा अभ्यास." पूणे; राष्ट्रीय शिक्षण सशोधन.

८.) देसाई, के. मोत्रा, एम. आणि चौधरी, व्हि. (२०१७), "एज्यूकेशन स्टेटअस, स्कूल ड्रॉपआऊट अॅण्ड इट्स रिझन, डिट्रेमाईन्ड अॅण्ड प्रस्पेक्टीव अमंग यंग गर्ल्स ऑफ ए सिटी ऑफ वेर्स्टन इंडिया." इंटरनॅशनल जनरल ऑफ मेडीकल सायन्स अॅण्ड पब्लीक हेल्थ.

९.) डेवल्ट, एम. डब्ल्यु. आणि कॅफ्री पी. आर. (२०००). "द रिलेशनशिप बिटविन द ड्रॉपआऊट रेट अॅण्ड अनएम्लॉयमेंट रेट." नॅशनल फोरम जनरल, लॉस एन्जीलीस (अमेरीका).

१०.) https://www.longdom.org/open-access/socioeconomic-factors-of-dropout-situation-in rural-primary-educationa-study-of-two-villages-in-rajshahi-district-2375-4435-1000176

११.) http://dropoutprevention.org/wpcontent/uploads/2015/05/13_Rural_School_Dropout_Issues_Report.pdf

१२.) https://www.thehindu.com/education/percentage-of-school-dropouts/article25909306.ece